DAY — 13 SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	28	1100	J-343	(M)

TEXTILES (44)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 70**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढाव्यात.

(३) उजवीकडील संख्या प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी सुयोग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा : (६) **[१८]**

(१) जलरोधक संस्करण यास करतात ------

(अ) कारपेट (गालिचे)

(ब) रेनकोट

(क) ब्लॅकेट

(२) नैसर्गिक रंगाकरिता भारत जगप्रसिद्ध होता ------

(अ) गंधक रंग

(ब) मॅडर

(क) इंडिगो

(३) निर्जल धुलाईचा शोषक घटक ------

(अ) स्टार्च

(ब) क्षार

(क) चिखल

(४) रेषांमुळे उंचीचा आभास होतो ------

(अ) उभ्या

(ब) आडव्या

(क) तिरक्या

(५) या तंतूला डायमंड (हिरे) तंतू म्हणतात ------

(अ) अँगोरा

(ब) मोहेर

(क) व्हिकुना

(६) ही नावीन्यपूर्ण वीण आहे ------

(अ) साधी वीण

(ब) हनीकोम्ब

(क) सॅटिन

(ब) योग्य जोड्या जुळवा : (६)

'अ' गट	'ब' गट
(अ) हॉगेट लोकर	(१) उत्तम दर्जाची लोकर
(ब) रेऑनचे दुसरे नाव	(२) पॉलिएस्टर
(क) साधी वीण	(३) कृत्रिम रेशीम
(ड) डेक्रॉन	(४) दोन वयाची चौकट
(इ) *GFRC* (जी.फ.आर.सी.)	(५) मृत मेंढी
(फ) मेरीनो लोकर	(६) १२ ते १४ महिन्यांची मेंढी
	(७) इमारत बांधणी

(क) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा : (६)

(१) रेशमाच्या कीटकाचे नाव लिहा जो कोषाच्या आत राहातो.

(२) खालील वाक्य 'बरोबर' की 'चूक' ते लिहा:

'व्हिकुना' सर्वात महाग लोकर आहे.

(३) अधोरेखित शब्दापासून अर्थपूर्ण शब्द तयार करा :

ल्स नॉ ई – कमी लांबी असलेल्या लोकरी तंतूना म्हणतात.

(४) वाक्य पूर्ण करा :

बाटिकमध्ये रंगविण्याच्या तंत्रामध्ये कपड्याच्या विशिष्ट भागात प्रतिरोधक म्हणून या पदार्थाचा वापर करतात .....

(५) मी कोण ओळखा ?

मी कलेच्या घटकांमधील महत्त्वाचा घटक आहे, जो डिझाईन (नमुन्या) मध्ये ओळखला जातो.

(६) खालील दिलेल्या शब्दातील सहसंबंध ओळखून त्यानुसार दुसरा सहसंबंध पूर्ण करा :

स्थायी संस्करण : मर्सरायझेशन : : अस्थायी संस्करण : .....

प्र. २. (अ) खालीलपैकी कोणत्याही सहा प्रश्नांची उत्तरे लिहा : (१२) **[१६]**

(१) खालील वाक्य बरोबर की चूक ते कारणासहित लिहा :

ताणे हे बाण्यापेक्षा मजबूत असतात.

(२) 'फॅशन' ची व्याख्या लिहा.

(३) ओली कताई स्पष्ट करा.

(४) कारणे द्या – रेशमी वस्त्रे काळजीपूर्वक धुवावे लागतात.

(५) फरक स्पष्ट करा – रंगविणे व छपाई

(६) वेदर लोकर स्पष्ट करा.

(७) व्हिकुना लोकर बद्दल थोडक्यात लिहा.

(ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : (४)

(१) जंगली रेशीम

(२) काच तंतूचे उपयोग

(३) लोकरी तंतूचे जैविक गुणधर्म

प्र. ३. (अ) खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा : (१२) **[१८]**

(१) लोकरीच्या कोणत्याही तीन भौतिक गुणधर्मावर माहिती लिहा.

(२) 'तोल' संज्ञा लिहून तोलाचे प्रकार स्पष्ट करा.

(३) चित्र ओळखा व स्पष्ट करा.



(४) नॉयलॉन तंतूचे उपयोग लिहा.

(५) निर्जळ धुलाई–पंप स्पष्ट करा.

(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) : (६)

(१) व्हिस्कोस रेयॉनचे उपयोग

(२) रंगसंगतीची व्याख्या लिहून रंगसंगतीचे कोणतेही दोन प्रकार स्पष्ट करा.

(३) तक्ता पूर्ण करून 'ब्रशिंग' संस्करण प्रक्रिया स्पष्ट करा.



प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : **[१८]**

(१) पॉलिएस्टरचे खालील गुणधर्म लिहा : **(६)**

(*i*) भौतिक गुणधर्म (कोणतेही चार) (४)

(*ii*) जैविक गुणधर्म (२)

किंवा

(*i*) 'विणणे' व्याख्या स्पष्ट करा. (१) **(६)**

(*ii*) हातमागाच्या विविध भागांचे स्पष्टीकरण करा. (५)

(२) (*i*) 'सेरीकल्चर' म्हणजे काय? (१)**(६)**

(*ii*) रेशमी कीटकाचे जीवनचक्र स्पष्ट करा. (५)

किंवा

(*i*) संस्करण प्रक्रियेची उद्‌दिष्ट्ये स्पष्ट करा. (४)**(६)**

(*ii*) मूलभूत संस्करण व उपयोगिता मूल्य वाढविणारे संस्करण स्पष्ट करा. (२)

(३) खालील भारतातील पारंपरिक वस्त्र छपाई विषयी लिहा : (६)

(*i*) कलमकारी

(*ii*) दाबू

(*iii*) बाग (*Bagh*)

किंवा

खालील उतारा वाचून त्यावरील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. **(६)**

मेदाम्ले व अल्कली यापासून तयार होणारा संयुक्त पदार्थ म्हणजे साबण होय. साबणाचे विविध प्रकार खालील प्रमाणे आहेत. उदासीन साबण – हे नैसर्गिक डिटर्जंट असतात. हे झाडांची वाळलेले व रसाळ फळे असतात, ज्यांचा स्वच्छताकारक घटक म्हणून प्राचीन काळापासून उपयोग केला जात आहे. यांचा वापर रेशमी व लोकरी वस्त्रांच्या धुलाईसाठी होतो. उदा. (रीठा), केस धुण्यासाठी शाम्पूच्या ऐवजी याचा उपयोग केला जातो. बिल्ट साबण – यामध्ये जास्त अल्कली व साबणाचे मिश्रण असते. याचा उपयोग सूती व लिननसाठी होतो कारण अन्य तंतूंमध्ये इतक्या जास्त प्रमाणात अल्कली सहन करण्याची क्षमता नसते. सामान्य साबणापेक्षा यांच्यात जास्त स्वच्छता शक्ती असते. कठीण साबण – हे साबण कडक असतात. ते पाण्यात कमी विद्राव्य असतात. त्यांना सहज फेस येत नाही. धुलाईसाठी जास्त श्रम व वेळ लागतो. उदा. सोडियम साबण.

(१) साबण म्हणजे काय? (१)

(२) साबणाच्या प्रकारांची नावे व सूची तयार करा. (२)

(३) कोणता साबण शाम्पू म्हणून उपयोगात आणतात? (१)

(४) तुम्हाला तुमचे कपडे धुण्यासाठी कठीण साबण आवडेल की मृदू साबण आवडेल. तुमचे उत्तर स्पष्टीकरण सहित लिहा. (२)

◆◆◆